# AU कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज (AUCL) ची WHT NOW सोबत भागीदारी; सायबर धोक्यांमुळे भारतातील तरुणांच्या आत्महत्त्या कमी होण्यात

मुंबई, : AU कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज (AUCL) हे आजच्या कायदेशीर सल्ला क्षेत्रातील आघाडीचे नाव असून त्यांनी आज एका मुख्य पथदर्शक उपक्रमासाठी भारतात सायबर गुंडगिरीच्या विळख्यात अडकलेल्या प्रत्येक मौल्यवान जीवाला वाचवण्यासाठी आणि संरक्षण देण्यासाठी सायबर छळ, सायबर गुंडगिरीच्या विरोधात तरुणांचा आवाज उठविणा-या WHT NOW सोबत भागीदारीची घोषणा केली आहे.




जसजसे डिजिटल युग एक-एक पाऊल पुढे टाकते तसतसे तंत्रज्ञानाने लोकांच्या संपर्क, संवाद साधण्याच्या आणि माहितीची देवाण-घेवाण करण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली आहे. तथापि, या तांत्रिक भरभराटीने सायबर गुंडगिरी, सायबर गुन्हे आणि सायबर छळ यासारख्या नवीन आव्हाने समोर उभी ठाकली आहेत. ही आव्हाने भारत आणि जगभर महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या म्हणून वेगाने उभी राहत आहेत. भारतासारख्या देशात या समस्या विशेषतः गंभीर आहेत. कारण इंटरनेटचा वापर झपाट्याने वाढलेला आहे. परंतु नियामक चौकट आणि जागरुकता या ऑनलाइन धोक्यांच्या तुलनेत मागे आहेत.

या प्रसंगी बोलताना, AU कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज (AUCL) संस्थापक अक्षत खेतान म्हणाले, भारत डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, सायबर गुंडगिरी, सायबर गुन्हे आणि सायबर छळामुळे उद्भवणा-या जोखमींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या समस्यांकडे धोरणकर्ते, शिक्षक, कायद्याची अंमलबजावणी करणारे आणि जनतेने तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. एक सर्वसमावेशक कायदेशीर चौकट तयार करून, जागरुकता वाढवून आणि कायद्याची अंमलबजावणी बळकट करून, भारत या ऑनलाइन धोक्यांचे हानिकारक परिणाम कमी करण्यास सुरुवात करू शकतो आणि इंटरनेट त्याच्या सर्व वापरकर्त्यांसाठी एक सुरक्षित जागा राहील याची खातरजमा करेल.

आजच्या तरुणांना भेडसावणा-या सायबर-गुंडगिरी/छळाच्या समस्यांवर प्रकाश टाकताना, 'WHT NOW च्या संस्थापिका आणि मानव कल्याणकर्त्या नीती गोयल म्हणाल्या, आमचे ध्येय एक सुरक्षित आणि सहाय्यक ऑनलाइन युवा समुदाय तयार करणे आहे जिथे ते सायबर गुंडगिरी आणि सायबर छळाच्या भीतीशिवाय संवाद साधू शकतील. सायबर छळाविरुद्ध आउटरीच अवेरनेस प्रोग्रामद्वारे युवा मंच उपलब्ध करून हे साध्य करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. पीडितांना सर्व आवश्यक सहाय्य देऊन त्यांना पाठिंबा देऊन आम्ही AU कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज (AUCL) सोबत सायबर जोखमीशी संबंधित समस्यांसाठी प्रभावी धोरणे आणि पद्धती विकसित करण्यासाठी सहकार्य केले आहे.

ख्यातनाम रेस्टॉरंट मालक आणि मानव कल्याणकर्त्या नीती गोयल, सायबर छळाचा सामना करण्यासाठी तरुणांना सक्षम बनवण्याच्या उद्देशाने 'WHT NOW,' सारख्या उपक्रमांसह सामाजिक कारणांसाठी अग्रगण्य वकील आहेत. प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि WHT NOWच्या सह-संस्थापिका डॉ. निवेदिता श्रेयांस यांनी या चळवळीला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एकत्रितपणे, सायबर गुंडगिरीतील चिंताजनक वाढीस तोंड देण्यासाठी, कायदेशीर मदत, मानसिक आरोग्य स्रोत आणि युवकांना भीती किंवा निर्णय न घेता मदत मागण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणारी एक समर्थन प्रणाली तयार करण्यासाठी ते एकत्र आले आहेत. त्यांच्या सहकार्यात्मक प्रयत्नांमुळे ऑनलाइन गैरवर्तनाविरुद्ध भारतातील सर्वात मोठ्या युवा चळवळीला चालना मिळत आहे.

यांव्यतिरिक्त, कायदेशीर साह्य आणि मदतीसाठी, AUCL आणि WHT NOW दोघेही गुंडगिरी/ छळाचे बळी ठरलेल्यांना बरे करण्यासाठी युवा मार्गदर्शक, सायबर गुन्हे पोलिस पथक, कायदेशीर मार्गदर्शन आणि समर्थन, व्यापक जनसंपर्क जागरुकता कार्यक्रम आणि भारतभरातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सामाजिक मोहिमा सुरू करतील. याव्यतिरिक्त, समाज संवेदनशील करण्यासाठी चर्चासत्रे, परिषदा, पॅनेल चर्चा, केस स्टडी विश्लेषण, रोड शो, वॉकथॉन, मेणबत्ती मोर्चा, नाटुकली, कला प्रदर्शन, वादविवाद आयोजित केले जातील.

WHT NOW ने AUCLच्या संयोगाने, तरुणांपर्यंत आऊटरिच प्रोग्राम राबवून, सरकारी धोरणांमध्ये सुधारणा करून, ते शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अनिवार्य भाग बनवणे आणि पालक शिक्षकांपर्यंत आऊटरिच प्रोग्रामद्वारे पालकांना संवेदनशील करणे याद्वारे सायबर गुंडगिरीचा धोका साध्य करणे आणि त्याचे उच्चाटन करणे हे उद्दिष्ट ठेवले आहे.